कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना२२५/२०२४ दि. ०३/११/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रात **कोळसेवाडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ **चे अनुषंगाने दिनांक ०४/११/२०२४ रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे १४४ कल्याण ग्रमीण विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार श्री प्रमोद (राजु) रतन पाटील यांच्या प्रचारार्थ पी. अँण्ड टी चौक डोंबिवली पुर्व येथे मनसे अध्यक्ष श्री. राज ठाकरे यांची सभा होणार आहे. त्यावेळी** सदर परिसरात मोठया प्रमाणात मनसे पक्षाचे कार्यकर्ते येणार असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून,** मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) मानपाडा रोड, शिवाजी उद्योगनगर, गांधीनगर चौक, तर्टे ऑफीस कडुन पी अँण्ड टी चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **मारूती मंदिराचे** बाजुला **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने मारूती मंदिराचे येथुन उजवीकडे वळुन नांदिवली नाला मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) मानपाडा रोड, साईबाबा मंदिर, सागांव कडुन पी अँण्ड टी चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनाना हन्री ट्रेकर्स, **पी अँण्ड टी कॉलनी** रोड येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने हन्री ट्रेकर्स येथुन उजवी कडे वळुन गांधीनगर अंतर्गत रस्ता, म्हात्रेनगर, सुभाष डेअरी मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) रॉयल इंग्लिश स्कुल कडुन पी अँण्ड टी चौकाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या आंगण सोसायटी येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने आंगण सोसायटी, नेरानगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) नांदिवली येथून पी अँण्ड टी चौकाकडे जाणाऱ्या वाहनांना **नांदिवली चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने नांदिवली नाला व नांदिवली टेकडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना दिनांक ०४/११/२०२४ रोजी सकाळी १२:०० वा. ते सभा संपे पावेतो अमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**<u>प्रत माहितीसाठी सविनय सादर</u>**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

**<u>प्रत</u>** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/–सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u>** :– समन्वय अधिकारी, १ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत</u>** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग,/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner